# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 10.09.2024** **वार – सोमवार**

---

**<u>वंदेभारत</u>**

राज्यातल्या तीन वंदे भारत एक्स्प्रेसचं उद्घाटन आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरस्थ माध्यमातून झालं. पुणे-हुबळी; या पुण्यातून सुरू होणाऱ्या पहिल्या वंदे भारत एक्स्प्रेसचाही यात समावेश होता. कोल्हापूर-पुणे आणि नागपूर-सिकंदराबाद या रेल्वे गाड्यांचं उद्घाटनही आज पंतप्रधानांच्या हस्ते दूरस्थ माध्यमातून झालं. केंद्रीय सहकार आणि नागरी हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पुण्यातून 'वंदे भारत' रेल्वेला हिरवा झेंडा दाखवला. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यावेळी उपस्थित होते. पुणे-हुबळी आणि कोल्हापूर-पुणे या दोन्ही गाड्या आठवड्यातून प्रत्येकी तीन दिवस धावणार आहेत.

**<u>विसर्जन</u>**

गणेशोत्सवाच्या अकरा दिवसांच्या चैतन्यमयपर्वाची उद्या अनंत चतुर्दशीच्या मुहूर्तावर सांगता होणार आहे. पुणे महापालिका आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले उद्या सकाळी दहा वाजता लोकमान्य टिळक यांच्या मंडईतील पुतळ्याला पुष्पहार अर्पण करतील; त्यानंतर पुण्याच्या वैभवशाली गणेश विसर्जन मिरवणूकीला सुरवात होईल. या विसर्जन मिरवणूकीसाठी महापालिका तसंच पोलीस प्रशासनानं जय्यत तयारी केली आहे.

विसर्जन घाटांवर दुरुस्ती, लोखंडी टाक्या, निर्माल्य कलश, विसर्जन हौद, याबरोबरच सार्वजनिक स्वच्छतेची काळजी घेण्यात येणार आहे. तसंच महापालिकेनं ठीकठिकाणी जीवरक्षकांची नियुक्ती केली आहे. मिरवणूक मार्गावर स्वच्छता आणि औषधोपचाराची व्यवस्था, करण्यात आली आहे. विद्युत विषयक देखभाल दुरुस्तीच्या कामांसाठी विद्युत विभागानंही सेवकांच्या नेमणूका केल्या आहेत.

गणेशोत्सवाच्या काळात पुण्यात गेल्या ९ दिवसांत महापालिकेकडे २ लाख किलो पेक्षा जास्त निर्माल्य जमा झालं. तर मूर्ती संकलन केंद्रात ४७ हजाराहून अधिक गणेश मूर्ती संकलित झाल्या आहेत. यंदा मूर्ती संकलन केंद्र, लोखंडी टाक्या आणि बांधलेले हौद असे पर्याय गणेश विसर्जनासाठी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

विसर्जन मिरणुकीसाठी शहरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे. अनेक वरिष्ठ पोलीस अधिकारी, पोलीस हवालदार, तसंच राज्य राखीव पोलीस दल, गृहरक्षकदल, आणि शीघ्र कृती दलाच्या तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. मिरवणूक मार्गावर २००हून अधिक सी सी टीव्ही कॅमेरे बसवण्यात आले आहेत.

विसर्जन मिरवणुकीत ध्वनीसंबंधात घालून दिलेल्या नियमांचं उल्लंघन करणाऱ्या मंडळावर कारवाई करण्यात येणार आहे. यासाठी १२६ ध्वनी पातळी नियंत्रण तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. अशी माहिती पोलीस आयुक्त अमितेष कुमार यांनी दिली.

अनंत चतुर्दशीनिमित्त उद्या पुणे शहरातील वाहतुकीत बदल करण्यात आला आहे.

दरम्यान गणेशोत्सवाच्या काळात पुणेकरांनी मेट्रो सेवेचा मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. गेल्या रविवारी पुणे मेट्रोची प्रवासी संख्या सुमारे पावणदोन लाखांवर गेली होती. उद्या सकाळी ६ वाजल्यापासून परवा सकाळी ६पर्यंत मेट्रो सेवा सुरू असणार असल्याचं पुणे मेट्रॉने कळवलं आहे.

**pcmc-विसर्जन**

पिंपरी चिंचवडमध्येही गणेश विसर्जन मिरवणुकीची तयारी अंतिम टप्प्यात आली आहे. यासाठी शहरांमध्ये 85 ठिकाणी महापालिकेने गणेशमूर्ती संकलन केंद्र तयार केली आहेत. विसर्जन घाटांवर कृत्रिम विसर्जन हौद उभारण्यात आले आहेत. शहरातील २७ विसर्जन घाटांवर जीवरक्षक साहित्यासह अग्निशमन पथक तैनात ठेवण्यात येणार आहे.

**ईद**

देशभरात आज ईदचा उत्साह आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, पंतप्रधान नरेंद्र मोदी तसंच राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी मुस्लीम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या आहेत. ईद मिलाद उन नबीची सार्वत्रिक सुट्टी मुंबई महानगर, उपनगर वगळता राज्यात सर्वत्र आज कायम ठेवण्यात आली आहे.

**बीसीजी लसीकरण**

क्षयरोग टाळण्यासाठी शासनाच्यावतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी बीसीजी लसीकरण मोहीम पुणे जिल्ह्यात सुरू झाली आहे. ज्येष्ठ नागरिकांनी बीसीजी लस घ्यावी, असं आवाहन पुणे जिल्हा आरोग्य विभागानं केलं आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान ३१ अंश तर किमान तापमान १८ पूर्णांक ७ दशांश अंश सेल्सियस नोंदवलं गेलं. उद्याही तापमान साधारण असंच असेल; तसंच आकाश अंशतः ढगाळ राहून हलक्या पावसाचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**